# प्रेसनोट दि. २७/०९/२०१७

## बेकायदा अग्निशस्त्र बाळगणारा विश्रामबाग पोलीसांकडून अटक

आरोपी नामे राजू विलास जाधव वय २० वर्षे रा. ८३/८४, राजीव गांधी नगर, जुना तोफखाना, शिवाजी नगर, पुणे हा दि. २६/०९/२०१७ रोजी २१.०० वा. धोबीघाट जवळ शनिवार पेठ, पुणे येथे अग्निशस्त्रासह आहे. अशी खबर विश्रामबाग पोलीस ठाणेचे पोलीस नाईक बाबा दांगडे व सचिन जगदाळे यांना मिळाली होती. त्याप्रमाणे वरील आरोपीस एक देशी बनावटीच कटटा व एक काडतुस बेकायदेशीर हत्यार जवळ बाळगले असताना मिळून आल्याने त्यास अटक करून त्याचे विरूध्द विश्रामबाग पोलीस ठाणे गुन्हा रजि. नंबर ४३३/२०१७ आर्म ॲक्ट कलम ३, २५ व मुंबई पोलीस ॲक्ट कलम ३७ (१) सह १३५ प्रमाणे दि. २६/०९/२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अटक आरोपीकडून ०१ देशी बनावटीचा कटटा व एक काडतुस, रोख रक्कम असे सर्व मिळून एकुण १०,६५०/- रू चा माल मिळून आला.

वरील कामगिरी परिमंडळ १ चे पोलीस उप-आयुक्त बसवराज तेली, सहा. पोलीस आयुक्त शरद उगले यांचे मार्गदर्शनाखाली विश्रामबाग पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अप्पासाहेब शेवाळे, पोलीस निरीक्षक गुन्हे अमृत मराठे पोलीस उप-निरीक्षक महेंद्र पाटील, पोलीस हवालदार शरद वाकसे, सचिन सुपेकर, पोलीस नाईक बाबा दांगडे, पोलीस शिपाई सचिन जगदाळे, राहूल पवार, यांनी केली आहे.

गुन्हयाचा पुढिल तपास विश्रामबाग पोलीस ठाण्याकडिल पोलीस उप-निरीक्षक महेंद्र पाटील हे करीत आहेत.